तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२ ०६०१, २२६९ ०६०२, २२६४ ११५०/५१, फॅक्स - २२६९ २१०२.
तार - EDUTECH E-Mail: desk2a@dte.org.in Internet: http://www.dte.org.in

अधिसूचना

क्रमांक :२अ/एडीएम/थेटद्विवर्ष/२००६/१४३९
दिनांक : २३ ऑगस्ट २००६

थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीचा अंतिम दिनांक वाढविण्याबाबत

शैक्षणिक वर्ष २००६-२००७ मधील थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी/तंत्रशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी यापूर्वी अंतिम दिनांक १६ ऑगस्ट २००६ जाहिर केलेला होता. परंतु मुंबई विद्यापीठाचा प्रथम वर्षाचा निकाल उशिरा जाहिर झाल्यामुळे सदरचा **अंतिम दिनांक (Cut off Date) २६ ऑगस्ट २००६ पर्यंत** वाढविण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने सर्व संबंधित संस्थांना कळविण्यात येते की, जे उमेदवार दि.२६ ऑगस्ट २००६ पर्यंत प्रवेश रद्द करतील त्यांना शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के रक्कम (शिक्षण शुल्क, विकास शुल्क व इतर शुल्क) कपात करुन ऊर्वरित रक्कम आणि मूळ प्रमाणपत्रे तात्काळ परत करण्यात यावीत.

-सही

(प्रा. न. बा. पासलकर)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.